PRESS RELEASE
For favour of Publication

Kirit Somaiya
B.Com., C.A.
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

MUMBAI PARLIAMENTARY OFFICE
Whip : BJP Parliamentary Party
President : Investors' Grievances Forum
President : Yuvak Pratishthan

Neelam Nagar, Mulund (E), Mumbai-81. Tel.: 2564 4151 (6 lines)•Fax : 2590 0699
E-mail : kiritsomaiya@hotmail.com•Website : www.kiritsomaiya.org

10 फेब्रुवारी, 2004

*<u>किरीट सोमैयांनी पत्रकार परिषदेत केलेले निवेदन</u>*

# कुर्ला, ट्रॉम्बे विभिन्न क्षेत्रात मोठया प्रमाणात बोगस मतदार?

किरीट सोमैया

## भाभा ॲटोमिक संषोधन केंद्रामध्ये बोगस मतदार खरे ठरले

ट्रॉम्बे येथील भाभा ॲटोमिक संशोधन केंद्र येथे वैज्ञानिकांच्या सोसायटीत 312 बोगस मतदार निवडणुक विभागाच्या अधिका–यांनी घुसविल्याचे खरे ठरले आहे. भारत सरकारच्या परमाणु ऊर्जा विभागाचे मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी श्री.सोमैया यांना लिहिलेल्या पत्रात असे स्पष्ट केले आहे की, मतदार यादीतील बीएआरसी. कॉलनीमध्ये राहत असलेल्या मतदारां संबधी गेल्या आठवडयात मुख्य निवडणुक आयुक्त, भारत सरकार, बी.ए.आर.सी. यांचे लक्ष वेधले होते.

श्री.सोमैया यांच्या पत्राची दखल घेऊन बीएआरसी वैज्ञानिक कॉलनी, अणुशक्ती नगर, येथील सुरक्षा विभागाने प्रत्येक घर, तसेच मतदार यादीतील प्रत्येक नांव पडताळून पाहिले. श्री.सोमैया यांना पाठविलेल्या उत्तरात मुख्य सुरक्षा अधिका–यांनी नमुद केले आहे की, ''मतदार यादीत मोठया प्रमाणातील नांवे ही अणुशक्ती नगर येथे राहत असलेली दाखविण्यांत आली आहेत. परंतु ते आमच्या विभागात राहत नाहीत. मतदार यादी बनविण्यांत आमचा सहभाग नसल्यामुळे आम्ही महाराष्ट्राच्या मुख्य निवडणुक अधिका–यांना त्वरीत कारवाई करण्यासाठी विनंती केली आहे.''

## कुर्ला, ट्रॉम्बे पुरवणी यादी – 10 हजार मतदार घुसविण्याचा प्रयत्न

कुर्ला व ट्रॉम्बे या विधानसभेत 2004 च्या पुरवणी मतदार यादीत मोठया प्रमाणात बोगस मतदार घुसविल्याचा पुर्न ऊच्चार श्री.सोमैयांनी केला. मुख्य निवडणुक कार्यालयात यासंबंधी त्यांनी तक्रार केली होती.

ट्रॉम्बे विधानसभेत आलेल्या नविन मतदार नोंदणीत 12,115 पैकी 5,376 अर्ज बोगस असल्याचे आता सिध्द झाले आहे. हे अर्ज निवडणुक विभागाने आता रद्द केले आहेत.

कुर्ला विधानसभा क्षेत्रात एकुण 22,470 अर्ज आले, त्यापैकी 5,316 अर्ज बोगस असल्याचे सिध्द झाले असुन तेही निवडणुक विभागाने रद्द करण्यांत आले आहेत.

श्री.सोमैया यांनी कुर्ला, ट्रॉम्बे या दोन्ही विधानसभा क्षेत्रात एवढया मोठया प्रमाणात बोगस मतदार नोंदण्याचे जे कट कारस्थान झाले त्याची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी केली आहे. मुख्य निवडणुक आयुक्त या प्रकरणात मध्ये पडले नसते तर काय झाले असते? महाराष्ट्रातील निवडणूक विभाग 10,000 बोगस मतदार नोंदण्याचे जे कट कारस्थान चालले आहे त्याकडे मुद्यामहून दुर्लक्ष करत असल्याचे श्री.सोमैया यांनी सांगितले.

हे सर्व अर्ज गठ्ठया गठ्ठयाने आले होते का? ठराविक वस्तीसाठी होते का? आणुन देणारी व्यक्ती कोण होती? हे सगळे का रद्द करण्यांत आले? यांच्या बरोबरची पुरावे बोगस, बनावट होते का? या सर्वांची चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे. निवडणुक व्यवस्थेशी खेळ करणे, मतदार यादीत बोगस मतदार नोंदविणे हा कायदेशीर गुन्हा आहे, दु:खद बाब आहे. बीएआरसीतील बोगस मतदार असो की, कुर्ला, ट्रॉम्बेचे बोगस मतदार असो, यावर नवी ''शक्ती'' व महाराष्ट्राचा निवडणुक विभाग काहीही कारवाई करत नाही.

ईशान्य मुंबईच्या एकंदर सहा विधानसभा क्षेत्रापैकी 4 विधानसभा मतदार संघात दोन हजार ते सहा हजार अर्ज फक्त आले होते. त्या तुलनेत कुर्ला 21,422 आणि 12,115 अर्ज आले होते.

———————————————